»» आधुनिक शहरातील घडामोडी

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

संपर्क : 8999948968 | शुक्रवार दिनांक02/01/2026 | METRO CITY VRUTANT

www.metrocityvrutant.in | पिंपरी चिंचवड व पुणे || पान 01 || अंक || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com

# प्रभाग 17 मध्ये शुभम वाल्हेकर ठरतायत विश्वासार्ह व जनतेशी जोडलेले युवा नेतृत्व

## जनसंवाद मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद; नागरिकांच्या प्रश्नांना थेट भिडणारी कार्यशैली ठरतेय ओळख



**पिंपरी–चिंचवड महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक 17 मध्ये राजकीय हालचालींना वेग आला असून, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून इच्छुक असलेले युवा नेतृत्व शुभम दिलीप वाल्हेकर हे नागरिकांच्या विश्वासाचे केंद्रबिंदू ठरताना दिसत आहेत. त्यांच्या जनसंवाद मोहिमेला परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, "थेट संवाद, प्रत्यक्ष सहभाग आणि संवेदनशील नेतृत्व" ही त्यांची ओळख अधिक ठळक होत आहे.**

चिंचवडे कॉलनी क्रमांक 1, 2, 3 तसेच आहेर गार्डन परिसरात शुभम वाल्हेकर यांनी घरोघरी जाऊन नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी, अपेक्षा आणि सूचना जाणून घेतल्या. केवळ औपचारिक भेटी न करता प्रत्येकाशी आपुलकीने संवाद साधणे, समस्या शांतपणे ऐकून घेणे आणि त्यावर उपाययोजनांचा विचार करणे, ही त्यांची कार्यपद्धती नागरिकांना भावताना दिसत आहे.या जनसंवादादरम्यान पाणीपुरवठा, रस्त्यांची दुरवस्था, स्वच्छता, वाहतूक कोंडी, सार्वजनिक सोयी-सुविधांचा अभाव, तसेच युवकांसाठी रोजगार व कौशल्यविकासाच्या संधी यांसारखे महत्त्वाचे मुद्दे नागरिकांनी मांडले. या प्रत्येक विषयाची नोंद घेत "नागरिकांच्या सहभागातूनच खऱ्या अर्थाने विकास साधता येतो. लोकांच्या अपेक्षा समजून घेऊन नियोजनबद्ध काम करणे हीच माझी भूमिका आहे," असे शुभम वाल्हेकर यांनी स्पष्ट केले. जनसंवाद मोहिमेदरम्यान उपस्थित पत्रकारांशी बोलताना त्यांनी पारदर्शक, जबाबदार आणि सकारात्मक राजकारणावर भर दिला. माध्यमांशी खुलेपणाने संवाद साधणे ही लोकशाहीची गरज असून, जनतेसमोर सत्य आणि स्पष्ट भूमिका मांडणे हेच आपले धोरण असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांच्या या स्पष्टवक्तेपणामुळे आणि संयमी भूमिकेमुळे राजकीय वर्तुळातही त्यांची प्रतिमा विश्वासार्ह नेतृत्व म्हणून अधिक मजबूत होत आहे.

या मोहिमेत महिला, ज्येष्ठ नागरिक, तरुण, स्थानिक कार्यकर्ते आणि सामाजिक घटक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. अनेक नागरिकांनी प्रभागात तरुण, ऊर्जावान, अभ्यासू आणि विकासाभिमुख नेतृत्वाची गरज असल्याचे मत व्यक्त केले. शुभम वाल्हेकर यांचा शांत स्वभाव, लोकांशी सहज संवाद साधण्याची हातोटी आणि नियोजनबद्ध काम करण्याची तयारी नागरिकांच्या मनाला भावल्याचे चित्र दिसून आले.

सध्याच्या निवडणूक वातावरणात जिथे बहुतांश प्रचार केवळ घोषणा आणि आरोप-प्रत्यारोपांपुरता मर्यादित असतो, तिथे शुभम वाल्हेकर यांची प्रत्यक्ष जनतेपर्यंत पोहोचणारी, संवादकेंद्रित आणि सकारात्मक भूमिका वेगळा संदेश देणारी ठरत आहे.त्यांच्या भेटीगाठी तात्पुरत्या राजकीय उपक्रमांपुरत्या मर्यादित न राहता, दीर्घकालीन बांधिलकी आणि प्रभागाच्या सर्वांगीण विकासाचा ठोस निर्धार दर्शवितात.प्रभाग क्रमांक 17 मध्ये निवडणुकीची रंगत वाढत असताना, सर्व घटकांना सोबत घेऊन विकासाचा समावेशक आणि विश्वासार्ह मार्ग निर्माण करण्याचा शुभम वाल्हेकर यांचा प्रयत्न नागरिकांचा विश्वास अधिक दृढ करत असून, ते एक सक्षम आणि आश्वासक युवा नेतृत्व म्हणून पुढे येताना दिसत आहेत.